# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U / 96 / 2008 / 17**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shantabai Mohan Kulkarni r/o Wahegaon, Tal.Gangapur, Dist,Aurangabad. ( Consumer No. 507440271691)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from of Shantabai Mohan Kulkarni r/o Wahegaon, Tal.Gangapur, Dist, Aurangabad.

The consumer has also filed an application in the Forum for passing interim order to reconnect the electricity supply of his residence which was disconnected on account of wrong bill and without giving any intimation as per provision in Electricity Act 2003.

**The hearing on the application of passing Interim order is fixed on 2.4.08 at 11.00 hrs.**

**Encl As above**.

Copy to :
Shantabai Mohan Kulkarni
r/o Wahegaon, Tal.Gangapur,
Dist,Aurangabad.

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U / 96 / 2008 / 17**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shantabai Mohan Kulkarni r/o Wahegaon, Tal.Gangapur, Dist,Aurangabad. ( Consumer No. 507440271691)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from of Shantabai Mohan Kulkarni r/o Wahegaon, Tal.Gangapur, Dist, Aurangabad.

The consumer has also filed an application in the Forum for passing interim order to reconnect the electricity supply of his residence which was disconnected on account of wrong bill and without giving any intimation as per provision in Electricity Act 2003.

**The hearing on the application of passing Interim order is fixed on 2.4.08 at 11.00 hrs.**

**Encl As above**.

Copy to :
Shantabai Mohan Kulkarni
r/o Wahegaon, Tal.Gangapur,
Dist,Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**(सीजीआरएफ/अेझेड/आर/९६/२००८/१७)**

**सौ. शांताबाई मोहन कुलकर्णी,**
**मु.पो. वाहेगांव, ता. गंगापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र. ५०७४४०२७१६९१)**

## विरुध्द

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,**
**ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय :- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक गा-हाणे निवारण मंच विद्युत लोकपाल)**
**विनीयम २००६,**

**दिनांक :- ०२/०४/२००८**

## अंतरिम आदेश.

ग्राहकाने महावितरण कंपनीकडून चुकीच्या वीज बिलाबाबत तसेच कोणतीही पुर्वसुचना न देता वीज पुरवठा खंडीत केल्याबद्दल तक्रार दाखल केली आहे.

अर्जदाराच्या विनंतीवरुन अंतरिम आदेश पारीत करण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/०४/२००८रोजी घेण्यात आली. नोडल अधिकारी श्री जैस्वाल, श्री मच्छिंद्र ना. ओव्हाळ, सहाय्यक अभियंता, व श्री व्हि. वाय. देशमुख, सहाय्यक लेखापाल, तसेच ग्राहकाचे प्रतिनीधी श्री मोहन कुलकर्णी सुनावणीच्या वेळी हजर होते.

सुनावणीदरम्यान महावितरण कंपनीने कोणतीही पुर्वसुचना न देता ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित केला हे आढळून आले. ज्यावरुन भारतीय वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उल्लघंन झाल्याचे दिसून येते. फेब्रुवारी २००८ च्या वीज बिलाची पाहणी केली असता ते थकबाकीसह एकूण रुपये २३५०/- चे आहे.सुनावणी दरम्यान ग्राहकाने रुपये १०००/- रक्कम भरण्याची तयारी दर्शविली.

**महावितरण कंपनीने, ग्राहकाने रुपये१०००/-भरल्यानंतर, २४ तासाच्या आत त्याच्या वीज पुरवठा पुनर्जोडणी करुन दयावा असा अंतरिम आदेश मंच पारीत करीत आहे.**

हा आदेश या गा-हाण्याबाबत मंचचा अंतिम निर्णय होईपर्यंत लागू राहील.वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/९६/२००८/१७**

**तक्रार दाखल दिनांक ;-२९/०३/२००८**
**निकाल दिनांक ;- १३/०५/२००८**

**सौ, शांताबाई मोहन कुलकर्णी ,**
**मु.वाहेगांव ता. गंगापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २९/०३/२००८ रोजी दाखल

केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक २९/०३/२००८ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली
व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.
अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा वीज ग्राहक क्रमांक ५०७४४०२७१६९१ असा आहे. त्याचे मीटर नादूरुस्त झाल्यामुळे त्याला मार्च २००८ च्या बिलात चुकीचे वीज बिल आकारण्यात आले व याबाबत त्याने महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-याकडे तक्रार केली पण त्याच्या तक्रारीची दखल न घेता कोणतीही पुर्वसुचना न देता त्याचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीसोबत त्याचा वीज पुरवठा पुनर्जोडणी करण्याबाबत अंतरीम आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे. ग्राहकाच्या विनंतीवरुन अंतरीम आदेशाबाबत ची सुनावणी दिनांक ०२/०४/२००८ रोजी ठेवण्यात आली.

२) दिनांक ०२/०४/२००८ रोजी ग्राहक प्रतिनिधी श्री मोहन कुलकर्णी तसेच नोडल अधिकारी श्री जे. जी. जैस्वाल,श्री एम.एन.ओव्हळ,सहाय्यक अभियंता हजर होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा वीज पुरवठा कोणतीही पुर्वसुचना न देता खंडीत केल्याचे मान्य केले. वीज बिलाच्या थकित रक्कमेचा आढावा घेवून अर्जदाराने रुपये १०००/- भरल्यानंतर २४ तासांच्या आत त्याचा वीज पुरवठा पुनर्जोडणी करण्याचा अंतरीम आदेश मंचाने पारीत केला व या बाबतची पुढील सूनावणी दिनांक १५/०४/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक १५/०४/२००८ रोजी ग्राहक प्रतिनिधी श्री मोहन कुलकर्णी तसेच नोडल अधिकारी श्री जे. जी. जैस्वाल,श्री एम.एन.ओव्हळ,सहाय्यक अभियंता हजर होते. नोडल अधिकरी यांनी अर्जदाराने रुपये १०००/- भरल्यानंतर त्याचा खंडीत केलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी करुन देण्यात आल्याचे मंचासमोर सांगितले व सुधारीत बिल देण्याबाबत मुदत वाढवून देण्याची विनंती मंचास केली. नोडल अधिकारी यांच्या विनंतीवरुन सुनावणी ची पुढील तारीख २२/०४/२००८ रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक २२/०४/२००८ रोजी ग्राहक / प्रतिनिधी हजर नव्हते नोडल अधिकारी श्री जे.जी. जैस्वल व श्री एम.एन. ओव्हळ सहाय्यक अभियंता आणि श्री व्ही. वाय. देशमुख सहलेखाअधिकारी हजर होते. नोडल अधिका-याने सी.पी.एल. व सुधारीत बिलाची प्रत मंचात दाखल केली दोन्ही बाजूकडून कागदपत्राची पुर्तता झाल्यामुळे सदरील प्रकरण निकालासाठी राखण्यात आले.

५) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन व सीपीएल.चे आवलोकन केल्यावर असे आढळून येते की, अर्जदाराचे मीटर हे चालू स्थितीत असून वीज वापराची योग्य ती नोंद त्यावर दर्शविली होती. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास सप्टेबर २००६ ते फेब्रुवारी २००८ अनेक वेळा सरासरीवर आधारीत किंवा फॉल्टी मीटर दाखवून वीज बिल आकारणी करण्यात आली जी चुकीची असल्याचे आढळून येते.यामुळे अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलात व्याज व दंड याची आकारणी केल्याचे आढळले अर्जदाराने वीज बिल दूरुस्तीबाबत केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता या चूकीच्या वीज बिलापोटी कोणतेही पुर्व सुचना न देता त्याचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. महावितरण कंपनीच्या या कृतीमुळे वीज कायदा २००३ कलम ५६ चे उल्लंघन झाल्याचे दिसुन येते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास दिलेले सप्टेबर २००६ व त्यापुढील दिलेली सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदाराच्या बिलात लावण्यात आलेले व्याज व दंड रद्द करुन ३० दिवसाच्या आत अर्जदारास सुधारीत बिल द्यावे.

३) कोणतीही पुर्व सुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे व वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उल्लंघन केल्यामुळे महावितरण कंपनीने अर्जदारास रुपये २५०/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/आर/९६/२००८/१७** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**२**) सौ, शांताबाई मोहन कुलकर्णी ,
मु.वाहेगांव ता. गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद.

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/९६/२००८/१७
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**